सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात सांगली येथे अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक- प्राफेब-२०१८/VIP६७/प्र.क्र.४२/म-१०
मंत्रालय, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९

वाचा:- विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचे पत्र क्र.मह-३/नैआ/अवेट/२१/१८, दिनांक २०.०३.२०१८

प्रस्तावना:-

सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्याची वाढणारी लोकसंख्या, मोठे क्षेत्रफळ, इ. बाबींमुळे सध्याच्या मिरज तालुक्यातील तहसील कार्यालयावर कामकाजाचा मोठा ताण पडत असल्यामुळे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील सांगली येथे स्वतंत्र अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील सांगली येथे स्वतंत्र अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्यास व त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे पद मंजुरीस व अन्य अनुषंगिक बाबीस प्रस्तुत शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. विद्यमान सांगली जिल्ह्यातील मिरज तहसिल प्रशासन बळकट करण्याच्या दृष्टीने अप्पर तहसिलदार, सांगली यांच्या नवीन कार्यालयासाठी खालील ७ पदे नियमित वेतनश्रेणीवर मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर पदे ही सध्याच्या त्या-त्या संवर्गाचा एक भाग राहतील.

अ.क्र.	पदाचे नाव	वेतनश्रेणी (रु.) (सातव्या वेतन आयोगानुसार)	मंजूर पदांची संख्या	एकूण
१	अप्पर तहसिलदार	S-१९- ५५,१००- १,७५,१००/-	१	१
२	नायब तहसिलदार	S-१४- ३८,६००- १,२२,८००/-	१	१
३	अव्वल कारकून	S-१२- ३२,०००- १,०१,६००/-	१	१
४	लिपिकटंकलेखक-	S-०६- १९,९००-६३,२००/-	४	४
		एकूण	**७**	**७**

२. तसेच सदर नवीन कार्यालयासाठी १ वाहनचालक व १ शिपाई यांच्या सेवा गरजेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सांगली जिल्ह्यातील तहसिलदार कार्यालय, मिरज तसेच अप्पर तहसिलदार कार्यालय, सांगली यांचे कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे महसुली मंडळे व गावे राहतील.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	महसुली मंडळे	एकूण महसुली गावे
१	तहसिलदार, मिरज	एकूण मंडळे - ७ मिरज (५ गावे), बेडग (७ गावे), मालगाव (६ गावे,) बेळंकी (१० गावे), आरग (७ गावे), भोसे (६ गावे), कवलापूर (९ गावे)	५०
२	अप्पर तहसिलदार, सांगली	एकूण मंडळे - ५ सांगली (६ गावे), कुपवाड (५ गावे), कसबे डिग्रज (६ गावे), कवठेपिरान (८ गावे), बुधगांव (६ गावे)	३१

४. सांगली जिल्ह्यातील तहसिलदार, मिरज तसेच अप्पर तहसिलदार, सांगली यांच्या कार्यक्षेत्रातील महसूल मंडळांतर्गत तलाठी साझे व त्यामध्ये अंतर्भूत होणाऱ्या गावांची यादी प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, सांगली यांचे स्तरावर करण्यात यावी.

५. अप्पर तहसिलदार, सांगली, ता. मिरज, जि. सांगली यांचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, सांगली हे काम पाहतील.

६. अप्पर तहसिलदार, सांगली, ता. मिरज, जि. सांगली यांना या शासन निर्णयान्वये कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १३ पोटकलम (३) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, तहसिलदार मिरज यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अप्पर तहसिलदार, सांगली यांना, त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रापुरत्या प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे अधिसूचना निर्गमित करण्यात येईल.

८. सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात अप्पर तहसिलदार, सांगली यांचे कार्यालय स्थापन करण्याकरिता येणारा खर्च " मागणी क्र. सी - १, २०५३ - जिल्हा प्रशासन, ०९३ (०१) जिल्हा आस्थापना (०१) (०३) आयुक्त, पुणे (२०५३ ००६४)" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व तो सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. मंजूर तरतूद अपुरी पडत असल्यास वाढीव तरतूदीची मागणी करावी व ते शक्य नसल्यास पूरक मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

९. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३३९/आपुक, दिनांक ७.९.२०१९ व नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीने दि.८.०७.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०९०९१३३३४९२६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVIRAJ VISHNU PHALLE

Digitally signed by RAVIRAJ VISHNU PHALLE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=d1a28181e23383c4e20fc8d5ff3d1c5505f086ea0b1eee5311
42b2aeec83a590, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=bea42246bc0bcf44a3792edbf80cc8f17c935de2c6b14
5c96db4be6a8a381506, ou=REVENUE DEPT, o=GOVERNMENT OF
MAHARASHTRA, cn=RAVIRAJ VISHNU PHALLE
Date: 2019.09.09 16:10:26 +05'30'

(रविराज फल्ले)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०००३५.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.४०००३२-
७. अप्पर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
८. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१०. प्रधान सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
११. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१२. विभागीय आयुक्त, पुणे.
१३. जिल्हाधिकारी, सांगली.
१४. उपविभागीय अधिकारी, मिरज, जि. सांगली
१५. तहसिलदार, मिरज, जि. सांगली
१६. अप्पर तहसिलदार, सांगली, ता. मिरज, जि. सांगली
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१९. कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (कार्यासन ई-३/ ई-८/ ई-९/ ई-१०/ ब-१/ज-५अ)
२०. वित्त विभाग (का. विसू-१/ अर्थसंकल्प -६/ व्यय-९/ आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई
२१. महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने
२२. निवड नस्ती-कार्यासन म-१०.